# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं dydepune@gmail.com

वेब साईट क्रमांक www.dydepune.com


जा.क्र./उमाशि-२/संमा/शिबिर/पुवि/२०१४/१२३२

दि :- १६/८/२०१४

16 AUG 2014

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
माध्यमिक विद्यालय संलग्न उच्च माध्यमिक विद्यालये
वरिष्ठ महाविद्यालयांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये
पुणे / सोलापूर / अहमदनगर

विषय :- अ) शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पट पडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता.

ब) तक्ता 'अ' मधील कायम शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मान्यता कार्यभारानुसार पुढे चालू ठेवणे.

क) तक्ता 'ब' मधील मान्यता प्राप्त असलेले पूर्ण वेळ शिक्षक ज्यांचा परिविक्षाधीन कालावधी चालू आहे. तसेच पूर्ण वेळ शिक्षण सेवक ज्यांचा शिक्षण सेवक कालावधी चालू आहे त्यांच्या मान्यता कार्यभारानुसार पुढे चालू ठेवणे.

संदर्भ :- १) शासन पत्र क्रं. एचएससी-१३९०/२२१५४०/(९४३४)/उमाशि-१ दि. १४/१२/१९९०
२) शासन पत्र क्रं. संकीर्ण १०९९/(२५५/९)माशि दिनांक ६/९/९५
३) शासन पत्र क्रं. एसएससी -२०११/(०१/११)/उमाशि-२ दिनांक २६/५/२०११
३) शासन निर्णय क्रं.एसएसएन १००७/(३६/०७)माशि-२ दि. ६/२/२०१२
४) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ, यांचे क्रं. रा.म./परिक्षा-२/६१७२/ दिनांक १७/९/२०१३

शैक्षणिक वर्ष सन २०१०-११ पासून पुणे विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालये / उच्च माध्यमिक विद्यालये संच मान्यता या विभागाची (वेबसाईट) संकेत स्थळ www.dydepune.com नुसार सॉफ्टवेअरवर ऑनलाईन पध्दतीने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती तज्ञ प्रशिक्षित व्यक्तीच्या मदतीने भरण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्येही संच मान्यते संबंधिची माहिती ऑनलाईन पध्दतीने वेबसाईटवरील संचमान्यतेचे सॉफ्टवेअरवर ऑनलाईन पध्दतीने आपल्या तज्ञ प्रशिक्षित व्यक्तीच्या मदतीने भरावयाची आहे. त्याबाबतच्या आवश्यक त्या सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१. आपल्या जिल्हयातील तालुक्याचे अथवा अन्य सोईच्या ठिकाणी संच मान्यतेची माहिती वेबसाईटवर भरण्यासाठी एक केंद्र निश्चित केलेले होते. शक्यतो माहिती आपल्या स्तरावरुन भरावी. काही अडचण निर्माण झाल्यास माहिती भरण्यासाठी प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तिची आवश्यक ती मदत घ्यावी. दिनांक

१९/८/२०१४ ते दिनांक २४/८/२०१४ या कालावधीत स. १०.३० ते सायं ५.३० या वेळेत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती वेबसाईटवर भरण्यात यावी. त्यानंतर वेबसाईटवर सॉफ्टवेअर उपलब्ध होणार नाही. आता जवळपास तीन ते चार वर्षापासून आपण ऑनलाईन माहिती भरता असल्याने आता सर्वच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व लिपिक यांना ऑनलाईन सॉफ्टवेअर ची पूर्णतः माहिती झालेली आहे. दिलेल्या कालावधीत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची सर्व माहिती भरुन घेण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. विहित मुदतीत माहिती भरली गेली नाही तर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची या वर्षीची संच मान्यता न होण्याची शक्यता आहे. त्यानंतर कोणतेही कारण ऐकून घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२. वेबसाईटवर माहिती भरण्यासाठी आपण आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित खालील कागदपत्रे सोबत ठेवून वेळापत्रकानुसार ऑनलाईन डाटा भरवयाचा आहे.

अ) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील संच मान्यता प्रत, शिक्षक मान्यता प्रत (पुरवणी मान्यतेसह)

ब) शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये इ. ११ वी व इ. १२ वी या वर्गात दिलेल्या प्रवेशानुसार शाखा व तुकडया निहाय विद्यार्थी संख्या (त्या विद्यार्थ्यांच्या नोंदी जनरल रजिस्टर मध्ये असाव्यात) जनरल रजिस्टरमध्ये नोंदी केलेल्या विद्यार्थ्यांचे इयत्ता १० वी तील शाळा सोडल्याचे दाखले.

क) शैक्षणिक वर्ष २०१४-१५ साठी तक्ता अ, तक्ता ब, तक्ता क मधील शिक्षक मान्यता बाबतची प्रपत्रे विहित नमुन्यात भरावीत.

३. उपरोक्त माहिती वेबसाईटवर तज्ञ प्रशिक्षकांमार्फत भरताना खालील बाबींची विशेषतः काळजी घ्यावी.

अ) माहिती वेळेत बिनचूक भरावयाची आहे. भरलेल्या माहितीची पूर्ण तपासणी व खात्री करावी. एकदा भरलेली माहिती ही अंतिम असणार आहे. त्यामध्ये माहिती एकदा **freeze** (फ्रिज) केल्यावर आपणास कोणताही बदल करण्याचा अधिकार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

ब ) तक्ता अ मध्ये माहिती भरताना जर एखादे पद सेवानिवृत्ती, मृत्यु, राजीनामा इ. कारणांमुळे रिक्त झाले असेल तर त्यासंबंधी माहिती भरताना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. सदर शिक्षकाच्या रिक्त झालेल्या पदावर संस्थेतील अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील (तक्ता अ मध्ये असलेल्या) शिक्षकाच्या बदलीने सदर पद भरले असेल तर त्या शिक्षकाची माहिती भरणे आवश्यक आहे. सोबत बदली आदेशाची प्रत जोडावी.

२. सदर रिक्त पदावर नवीन नियुक्ती असेल तर त्याबाबतची माहिती तक्ता क मध्ये या कार्यालयाची ना हरकत प्रमाणपत्र (NOC) घेतले असल्यासच घेता येईल. परंतू सदर रिक्त पद भरण्याबाबत

या कार्यालयाची एनओसी घेणे अत्यंत आवश्यक आहे. एनओसी घेतली नसल्यास नवीन भरलेल्या शिक्षकांच्या नावाचा समावेश तक्ता क मध्ये करु नये.

३. जर सेवानिवृत्तीची तारीख १ जून ते ३१ डिसेंबर २०१४ असेल तर त्यांचे नाव व सेवानिवृत्तीचा दिनांक नमूद करुन तक्ता अ मध्ये समाविष्ठ राहील.

४. जर सेवानिवृत्तीची तारीख १ जानेवारी ते ३१ मे २०१४ अशी असेल तर त्यांचे नाव तक्ता अ मध्ये समाविष्ट करु नये.

क) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये तक्ता ब मधील पूर्णवेळ शिक्षक/ शिक्षण सेवक यांना मान्यता आहे व ज्यांचा परिविक्षाधीन कालावधी चालू आहे. अशा शिक्षक/शिक्षण सेवकांची नोंद तक्ता ब मध्येच घ्यावी.

ड) तक्ता ब मधील पूर्णवेळ शिक्षक/शिक्षण सेवक यांचा परिविक्षाधिन कालावधी / शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झाला असेल अशा शिक्षकांची नोंद तक्ता अ मध्ये घ्यावी. तथापि तक्ता अ मधील मान्यतेबाबतची संपूर्ण कागदपत्रे पटपडताळणी प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

इ) शैक्षणिक वर्ष २०१३ - १४ मध्ये मान्यता प्राप्त असलेले अर्धवेळ / प्र. घ. ता. शिक्षक यांची माहिती तक्ता क मध्ये भरण्यात यावी. तसेच शेक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये मान्यता प्राप्त असलेले माध्यमिक शिक्षक उच्च माध्यमिकचा कार्यभार घेत होते त्यांचा कार्यभार फक्त अध्यापनासाठी मान्य केला जाईल, त्यांची नावे तक्ता क मध्ये घ्यावीत. सेवानिवृत्ती, मृत्यु, राजीनामा इत्यादी कारणामुळे रिक्त झालेल्या पदावर शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये पूर्णवेळ शिक्षक / शिक्षण सेवक यांची नियुक्ती केली असेल तर त्यांची नावे तक्ता क मध्ये या कार्यालयाच्या ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय समाविष्ठ करु नये व असेच ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले प्रस्ताव नवीन पूर्णवेळ शिक्षक / शिक्षण सेवक नियुक्ती मान्यता प्रस्ताव वैयक्तिक मान्यता शिबीरात सादर करावेत. (उपरोक्त नमूद केलेल्या ब मधील अ.क्र. २ नुसार)

ई) शैक्षणिक वर्षे २०१४-१५ मध्ये आपल्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विषयासाठी विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे अथवा एखाद्या शाखेला विद्यार्थी संख्या कार्यभार गणना करण्याइतपत उपलब्ध न झाल्याने मान्य शिक्षकांचा पदवीका /पदवी विषयाचा कार्यभार १३.३० किंवा त्यापेक्षा कमी होत असेल तर अशा शिक्षकास / अतिरिक्त घोषित करुन प्रथमतः संस्थां अंतर्गत तात्काळ समावेशन करण्यात यावे. संस्थेत अतिरिक्त शिक्षक समायोजनासाठी रिक्त जागा नसेल तर अशा वेळी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नुसार संस्था

आरक्षणाचा विचार करुन अतिरिक्त ठरणा-या शिक्षकांचा प्रस्ताव या कार्यालयास तात्काळ सादर करावा अन्यथा सदर शिक्षकास अदा केलेल्या जादा वेतनास संबंधित प्राचार्य जबाबदार राहतील.(आवश्यकतेनुसार वेळीच कार्यालयाचे मागदर्शन घेण्यात यावे.)

आपण सॉफ्टवेअरवर ऑनलाईन पध्दतीने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती तज्ञ प्रशिक्षित व्यक्तीच्या मदतीने वेबसाईटवर माहिती भरल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मधील संच मान्यतेची ऑनलाईन भरलेली माहिती तपासून सदर प्रतीवर प्राचार्य, यांनी पटपडताळणी साठी सादर केलेली विद्यार्थी संख्या बाबतची माहिती व नमूद विद्यार्थी यांचा घातलेला मेळ बरोबर असल्याबाबत सदर पटपडताळणी व शिक्षक संच प्रतीवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. प्रस्तावीत मान्यता तपासून नमूद करणे आवश्यक आहे. विद्यार्थी संख्या, अनुदान प्रकार, मान्य व अनुदानीत विषय तसेच मंजूर करुन घेत असलेला कार्यभार व शिक्षक संचामधील तक्ता अ व क मधील प्रस्तावीत माहिती असत्य /खोटी निघाल्यास त्यास प्राचार्य हे वैयक्तिक जबदाबदार राहील व त्याबाबत नियमानुसार होणा-या कार्यवाहीस पात्र राहतील.

आपणास संच मान्यता, तक्ता अ व ब मधील मान्यता आदेश देण्याबाबत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार घेण्यात येणाऱ्या शिबिराचे संभाव्य वेळापत्रक सोबत या कार्यालयाच्या www.dydepune.com वर प्रसिध्द करण्यात येत आहे. या वेळापत्रकात बदल झाल्यास तशा सुचना विभागाच्या www.dydepune.com या संकेत स्थळावर देण्यात येतील. त्यासाठी वेळेची बचत व प्रशासकीय कामात गतिमानता, अचूकता तसेच आधुनिक युगात संगणक प्रणालीचा वापर यासाठी कार्यालयाची वेबसाईट नियमित पहावी. यापुढे कोणत्याही प्रकारची परिपत्रके पोस्टाने पाठवली जाणार नाहीत ती वेबसाईटवरच दिली जातील. तिथून ती Download करुन घ्यावीत.

संच मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी जिल्हावार फाईल्सचे रंग खालील प्रमाणे

१) पुणे - **हिरवा** २) सोलापूर - **पिवळा** ३) अहमदनगर - **तांबडा**

**शिबिरास येताना फाईल सोबत आणावयाची कागदपत्रे.**

१. वेबसाईटवर ऑनलाईन भरलेल्या माहितीची छापील प्रत.
२. शै. वर्ष २०१४-१५ मध्ये इयता ११ वी व इ. १२ वी मधील प्रवेश नोंदविलेल्या परिपूर्ण जनरल रजिस्टर, शाळा सोडलेल्या दाखल्याची फाईल.
३. कार्यभार गणण तक्ता.
४. शिक्षकांना दिलेल्या कार्यभारानुसार वेळापत्रक.
५. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास दिलेल्या संच मान्यता व शिक्षक मान्यता पुरवणी मान्यतेसह आदेशाच्या झेरॉक्स प्रती.

६. या परिपत्रकासोबत दिलेल्या सांख्यिकी माहितीचे प्रपत्र.

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा एच.एस.सी बोर्डाने दिलेला सांकेताक क्रमांक पाहून संच मान्यता शिबिराच्या वेळापत्रकानुसार दिलेल्या दिनांकास व वेळेत परिपूर्ण प्रस्ताव सादर करुन संच मान्यता व शिक्षक मान्यता प्राप्त करण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. त्यासाठी सर्व माहिती प्राप्त करुन दिलेल्या दिनांकास व वेळेतच सर्व रेकॉर्ड घेवून आपल्या प्रतिनिधीस उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात. दिलेल्या दिनांकास व वेळेत आपले प्रतिनिधी उपस्थित राहीले नाहीत व त्यामुळे संच मान्यता झाली नाही तर त्याची जबाबदारी प्राचार्य यांच्यावर राहील. अनुदानीत, अंशतः अनुदानीत, विनाअनुदानीत, कायम विनाअनुदानीत तत्वावरील मान्यताप्राप्त सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०१४-१५ ची संच मान्यता झाल्या शिवाय बोर्डाचे परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत तसेच माहे नोव्हेंबर पासूनचे वेतनावरील अनुदान रोखण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सोबत : शिबिराचे वेळापत्रक

(बाळासाहेब ओव्हाळ )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १ करिता

प्रत माहितीसाठी-:

१. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १. यांना माहितीस्तव सविनय सादर.

माहिती व कार्यवाहीसाठी :-

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,
पुणे / सोलापूर / अहमदनगर
यांना सुचित करण्यात येते की शिबिर कालावधीत सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक, (उच्च माध्यमिक) यांना शिबिराच्या ठिकाणी उपस्थित राहणे बाबत आदेश द्यावेत.

खालील नमूद प्राचार्य यांनी शिबिर कालावधीत आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

१. प्राचार्य, वालचंद महाविद्यालय, सोलापूर
२. प्राचार्य, उमा महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर
३. प्राचार्य, न्यू आर्टस् सायन्स व कॉमर्स कॉलेज, अहमदनगर
४. प्राचार्य, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर
५. प्राचार्य, कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे
६. प्राचार्य, नौरोसजी वाडीया महाविद्यालय, पुणे
७. प्राचार्य, जयहिंद हायस्कूल व ज्युनि कॉलेज, पिंपरी, पुणे
८. प्राचार्य, एस. व्ही. युनियन हायस्कूल ज्युनि कॉलेज, सोमवार पेठ,पुणे १

# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १.

**शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील संच मान्यता तक्ता अ व ब मधील शिक्षकांच्या मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत आयोजित केलेले शिबिराचे वेळापत्रक**

| दिनांक | वेळ | शिबिराचे ठिकाण | तालुके व क.म.वि संख्या |
|---|---|---|---|
| २५/८/२०१४ | स.१० ते ५ | **उमा महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर** | पंढरपूर (३६) |
| २६/८/२०१४ | | | मोहोळ (२०) करमाळा (१४) **एकूण ४०** |
| २७/८/२०१४ | | | सांगोला (२३), मंगळवेढा (१७), **एकूण ४०** |
| २८/८/२०१४ | | | माळशिरस (२६) |
| २/९/२०१४ | स.१० ते ५ | **वालचंद महाविद्यालय, सोलापूर** | अक्कलकोट (२४), |
| ३/९/२०१४ | | | सोलापूरशहर<br>सां.क्रं.२४०९००१ ते २४०९०५० (५०) |
| ४/९/२०१४ | | | सोलापूरशहर<br>सां.क्रं.२४०९०५१ ते २४०९०९९ (४९) |
| ५/९/२०१४ | | | बार्शी (४२) |
| ६/९/२०१४ | | | माढा (२९) |
| १०/९/२०१४ | स.१० ते ५ | **पद्मश्री विखेपाटील महाविद्यालय, प्रवरानगर, लोणी, ता. रहाता, जि. अहमदनगर** | कोपरगांव (१६) राहाता (२०) **एकूण ३६** |
| ११/९/२०१४ | | | संगमनेर (३७) |
| १२/९/२०१४ | | | श्रीरामपूर (२८) |
| १३/९/२०१४ | | | अकोले (२६) |
| १६/९/२०१४ | स.१० ते ५ | **न्यू आर्टस् सायन्स व कॉमर्स कॉलेज, अहमदनगर** | कर्जत (२४) जामखेड (१०) **एकूण ३४** |
| १७/९/२०१४ | | | अहमदनगर शहर (५५) |
| १८/९/२०१४ | | | नेवासा (१७) पारनेर (२३) **एकूण ४०** |
| १९/९/२०१४ | | | श्रीगोंदा (२४) शेवगांव (२०) **एकूण ४४** |
| २०/९/२०१४ | | | राहुरी.(१५), पाथर्डी (२४) **एकूण ३९** |

| दिनांक | वेळ | शिबिराचे ठिकाण | तालुके व क.म.वि. संख्या |
|---|---|---|---|
| २२/९/२०१४ | स.१० ते ५ | **कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे** | दौंड (२४) |
| २३/९/२०१४ | | | शिरुर (२५) |
| २४/९/२०१४ | | | वेल्हा (०५),भोर (१३) पुरंदर(२५) **एकूण ४३** |
| २५/९/२०१४ | | | इंदापूर (२८), |
| २६/९/२०१४ | | | बारामती (१९) |
| ३०/९/२०१४ | स.१० ते ५ | **नौरोसजी वाडीया महाविद्यालय, पुणे** | **पुणे** शहर पूर्व सां.क्रं.१११५००१ ते १११५०३७ (३७) |
| १/१०/२०१४ | | | **पुणे** शहर पूर्व सां.क्रं.१११५०३८ ते १११५०७५ (३८) |
| ४/१०/२०१४ | | | पुणे शहर पश्चिम सां.क्रं.११११००१ ते ११११०३७ (३७) |
| ७/१०/२०१४ | | | पुणे शहर पश्चिम सां.क्रं.११११०३८ ते ११११०७३ (३६) |
| ८/१०/२०१४ | स.१० ते ५ | **जयहिंद हायस्कूल व ज्युनि कॉलेज, पिंपरी, पुणे** | हवेली (३४), खेड (१६) **एकूण ५०** |
| ९/१०/२०१४ | | | आंबेगांव (२१) जुन्नर (२८) **एकूण ४९** |
| १०/१०/२०१४ | | | मावळ (१०) मुळशी (०६), **एकूण १६** |
| १४/१०/२०१४ | | | पिंपरी चिंचवड सां.क्रं.१११६००१ ते १११६०२७ (२७) |
| १५/१०/२०१४ | | | पिंपरी चिंचवड सां.क्रं१११६०२८ ते १११६०५१ (२०) |
| १६/१०/२०१४ | स. १० ते ५ | **एस व्ही. युनियन हायस्कूल ज्युनि कॉलेज, सोमवार पेठ, पुणे १** | सोलापूर जिल्हा उर्वरीत सर्व |
| १७/१०/२०१४ | | | अहमदनगर जिल्हा उर्वरीत सर्व |
| १८/१०/२०१४ | | | पुणे जिल्हा उर्वरीत सर्व |